RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. 01 जून 2026**



१९३६- राजकीय परिषदेपुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
१९४०- पुणे येथे महार इलाखा परिषद.
१९१३- सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी बाबासाहेबांना शिष्यवृत्ती बहाल केली.
१९४२- दुसऱ्या महार बटालियनची कामठी येथे स्थापना.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

सोमवार, ०१ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १५२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Monday, 01 June 2026 | Year : 6 | Issue : 152 | Daily | Rate: Rs. 5/-

# लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिला अपात्र ?



**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमधून तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरण्याची किंवा त्यांना लाभ न मिळण्याची भीती समोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.**

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पात्र महिलांना इ-केवायसी करण्याकरता मुदत देण्यात आली होती. मात्र, ही मुदत आता संपुष्टात आली असून या छाननी प्रक्रियेतून तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्या असल्याची माहिती शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी दिली. त्यामुळे, अपात्र महिलांना आता या योजनेअंतर्गत देण्यात येणारा १५०० रुपयांचा सन्मान निधी दिला जाणार नाही. दरम्यान, यावरून आता विरोधी पक्षाने यावर टीका करायला सुरुवात केली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही याविरोधात टीका केली.

“लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिलांना अपात्र ठरविण्यात आले. निवडणुकीच्या काळात कसलीही खातरजमा न करता घाईघाईने या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आणि आता साधारणपणे वर्ष-दीड वर्षाने सरकारला या योजनेत ८० लाख महिला अपात्र असल्याचा साक्षात्कार व्हावा ही मोठी अजब बाब आहे. हे या सरकारचे राजकीय, प्रशासकीय आणि अंमलबजावणीतील सामूहिक दारुण अपयश आहे”, असे म्हणत सुप्रिया सुळेंनी सरकारवर निशाणा साधला.

*“जनतेच्या कष्टातून निर्माण झालेला कर रुपी पैशांतून ही योजना चालविली जाते. थोडक्यात जनतेचा पैसा गेली वर्ष दीड वर्ष हे सरकार अपात्र लाभार्थ्यांना वाटत होते का असा प्रश्न उपस्थित होतो. ही संपूर्ण बाब मूळात या सरकारचे घोर अपयश उघड करणारी आहे. हे दिलेला शब्द पाळणारे सरकार नाही. केवळ निवडणुकीतील फायदा गृहित धरून त्यांनी महिलांना खोटे आमिष दाखविण्याचा उद्योग केला असे यावरुन स्पष्ट होते. तब्बल ऐंशी लाख महिलांना अपात्र घोषित करून या सरकारने राज्यातील महिलांचा विश्वासघात केला आहे”,* असे म्हणत त्यांनी सरकारवर शाब्दिक चपराक लगावली आहे.

> **“हा ८० लाख हा आकडा छोटा नाही. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रातील प्रत्येक भगिनीस ‘लाडकी बहीण’ योजनेचे लाभ नियमितपणे मिळालेच पाहिजेत अशी आमची भूमिका आहे. यासाठी त्यांना विशिष्ट मुदतीत केवायसी करण्याची आडकाठी असू नये. राज्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी त्यांना केवायसी करण्याची संधी कायम उपलब्ध करून द्या”, असं आवाहन सुप्रिया सुळेंनी सरकारला केले आहे.**

# जागतिक क्रमवारीत आयआयएम अहमदाबादची घसरण

**आरटीआय खुलाशातून वास्तव समोर**



**अहमदाबाद :** देशातील सर्वोच्च व्यवस्थापन शिक्षण संस्थांपैकी एक असलेल्या Indian Institute of Management Ahmedabad (आयआयएम अहमदाबाद)च्या जागतिक क्रमवारीतील घसरणीचे वास्तव माहितीच्या अधिकार (RTI) अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकृत कागदपत्रांमधून समोर आले आहे. देशांतर्गत क्रमवारीत अव्वल स्थान कायम राखणाऱ्या या संस्थेची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठा मात्र गेल्या काही वर्षांत कमी होत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. आयआयएम अहमदाबादचे केंद्रीय जनमाहिती अधिकारी डॉ. मुकेश शर्मा यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार, २०२३ ते २०२५ या कालावधीत संस्थेच्या विविध जागतिक क्रमवारींमध्ये लक्षणीय घसरण झाली आहे. विशेषतः जगभरातील प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या क्यूएस (QS) वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये आयआयएम अहमदाबादचे स्थान सातत्याने खाली आले आहे. 'QS ग्लोबल एमबीए रँकिंग'मध्ये २०२३ साली ४४ व्या क्रमांकावर असलेली संस्था २०२४ मध्ये ५३ व्या क्रमांकावर घसरली, तर २०२५ मध्ये ती थेट ६० व्या स्थानावर पोहोचली. म्हणजेच अवघ्या दोन वर्षांत संस्थेने १६ स्थाने गमावली आहेत. या कालावधीत संस्थेचा एकूण गुणांकही ६६.३ वरून ६३.३ पर्यंत घसरला आहे. तसेच, 'QS बिझनेस मास्टर्स रँकिंग : मॅनेजमेंट' या श्रेणीतही संस्थेची कामगिरी चिंताजनक राहिली आहे. २०२३ मध्ये २९ व्या क्रमांकावर असलेले आयआयएम अहमदाबाद २०२४ मध्ये ४२ व्या क्रमांकावर आले आणि २०२५ मध्ये त्यांची घसरण होऊन ते ५६ व्या स्थानावर पोहोचले. या श्रेणीत संस्थेने केवळ दोन वर्षांत २७ स्थाने गमावली असून गुणांक ७०.४ वरून ६०.७ पर्यंत खाली आला आहे.

*विशेष म्हणजे, भारत सरकारच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा (NIRF) अंतर्गत आयआयएम अहमदाबाद अजूनही देशातील सर्वोत्तम व्यवस्थापन संस्था म्हणून ओळखली जाते. मात्र आंतरराष्ट्रीय मूल्यमापन करणाऱ्या स्वतंत्र संस्थांच्या निकषांवर त्यांची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे या आकडेवारीतून दिसून येत आहे.*

शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, जागतिक क्रमवारीत संशोधनाची गुणवत्ता, आंतरराष्ट्रीय प्राध्यापक व विद्यार्थी, उद्योग क्षेत्राशी संबंध, शैक्षणिक प्रतिष्ठा आणि जागतिक प्रभाव यांसारख्या निकषांना महत्त्व दिले जाते. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे आयआयएम अहमदाबादसाठी आवश्यक ठरणार आहे. आरटीआयमधून समोर आलेल्या या आकडेवारीमुळे भारतातील उच्च शिक्षण संस्थांच्या जागतिक स्पर्धात्मकतेबाबत नव्याने चर्चा सुरू झाली असून, देशांतर्गत वर्चस्व आणि जागतिक मानांकन यातील वाढती दरी अधोरेखित झाली आहे.

## महत्वाच्या बातम्या

### जिल्ह्यातील ४० शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह नाही...

**नागपूर :** विकास कामे, उपक्रम आणि उत्सवाच्या नावांवर हजारो कोटींचा निधी शासनाकडून खर्च करण्यात येतो. परंतु शिक्षण आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या सुविधांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. यावर निधीच खर्च होत नसून झाला तरी तो दिसून येत नाही. नागपूर जिल्ह्यातील ४० शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह नाही, तर ६७ शाळांमध्ये वीज नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नागपूर हे उपराजधानीचे शहर आहे. राज्याचे मुख्यमंत्री, महसूल मंत्री, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री येथेच राहतात. दिग्गज मंत्री, नेते असतानाही शाळांची दुरावस्था असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.खेळाचे मैदान ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक बाब मानली जाते. मात्र, ३९५९ पैकी केवळ ३८४७ शाळांमध्येच मैदान आहे. म्हणजेच ११२ शाळांमध्ये खेळासाठी मैदानच नाही.

### नीट’ घोळानंतर जुनीच ‘केवायडी’ डॉक्टरांना सक्तीची

**यवतमाळ :** ‘नीट’ परीक्षेतील कथित पेपरफुटी, गैरप्रकार आणि गुणांमधील घोटाळ्यांमुळे एकूणच डॉक्टरांच्या गुणवत्तेवर आणि संपूर्ण वैद्यकीय निवड प्रक्रियेवर समाजात प्रचंड अविश्वास निर्माण झाला आहे. या प्रवृत्तींमुळे प्रामाणिक विद्यार्थी आणि रुग्ण या दोघांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. अशावेळी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) सर्व नोंदणीकृत डॉक्टरांसाठी ‘केवायडी’ म्हणजेच ‘नो युअर डॉक्टर’ अंतर्गत क्यूआर कोड दर्शनी भागावर लावणे बंधनकारक केले आहे. बँकिंग क्षेत्रातील ‘केवायसी’च्या धर्तीवर आता आरोग्य क्षेत्रातही डॉक्टरांना आपली संपूर्ण खरी माहिती रुग्णांसमोर ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांची १०,००० कोटी रुपयांच्या मदत पॅकेजची मागणी

**नाशिक :** महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केंद्र सरकारकडे १०,००० कोटी रुपयांच्या विशेष मदत पॅकेजची मागणी केली आहे. त्यांच्या मते, वारंवार होणारी निर्यातबंदी, नैसर्गिक आपत्ती आणि भावात झालेली मोठी घसरण यामुळे ते गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भरत दिघोळे एसकेएमने २७ मे पासून देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली असून, एमएसपी आदेशांच्या प्रती जाळण्याचे आवाहन केले आहे. एसकेएमने २७ मे पासून देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली, सरकारवर बनावट किमान आधारभूत किंमत (MSP) प्रणाली लागू केल्याचा आरोप. दिघोळे यांच्या मते, चुकीची निर्यात धोरणे, बनावट बियाणे आणि साठवणुकीदरम्यान होणारे नुकसान यामुळे गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले आहे. केंद्र सरकारने २०१९, २०२० आणि २०२३-२४ मध्ये कांदा निर्यातीवर बंदी घातली होती. याशिवाय, ४० टक्के निर्यात शुल्क आणि वेगवेगळ्या वेळी किमान निर्यात किंमत निश्चित करण्यासारख्या निर्णयांनीही शेतकऱ्यांचे नुकसान केले.

### खाजगी शाळांनी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त शुल्क आकारल्यास मान्यता रद्द

**चेन्नई :** तामिळनाडू सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. आता राज्यातील सर्व खाजगी शाळांना त्यांच्या सूचना फलकांवर शिक्षण शुल्क प्रदर्शित करणे बंधनकारक असेल. हे शुल्क सरकारद्वारे निर्धारित केले जाते. काही शाळा निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने हे पाऊल उचलले आहे. विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने रविवारी सांगितले की, राज्यातील सर्व सरकारी आणि खाजगी शाळा ४ जूनपासून पुन्हा सुरू होत आहेत. निर्धारित रकमेपेक्षा जास्त शुल्क आकारणाऱ्या कोणत्याही खाजगी शाळेची मान्यता रद्द केली जाईल. तामिळनाडूमध्ये सध्या १३,००० पेक्षा जास्त मान्यताप्राप्त खाजगी शाळा आहेत. अधिकाऱ्यांनी शाळांना पालकांकडून कोणतेही छुपे प्रवेश शुल्क आकारू नये, अशा कडक सूचना दिल्या आहेत. हा नियम 'तामिळनाडू शाळा (शुल्क संकलनाचे नियमन) सुधारणा कायद्या'अंतर्गत लागू करण्यात आला आहे.

## भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष १० दिवसांच्या प्रदर्शनासाठी मंगोलियात



**नवी दिल्ली :** भगवान गौतम बुद्ध यांचे काही पवित्र अवशेष शनिवारी मंगोलिया देशात पाठवण्यात आले आहेत. भगवान गौतम बुद्ध यांचे पवित्र अवशेष भारतीय हवाई दलाच्या ‘आयएल-७६’ (गजराज) या विमानाने शनिवारी दिल्लीवरून मंगोलिया या देशात पाठवण्यात आले आहेत. हे पवित्र अवशेष भारतीय वायुसेनेने मंगोलिया या देशात पोहोचवले आहेत. दरम्यान, भगवान गौतम बुद्ध यांचे पवित्र अवशेष म्हणजेच बौद्धधातू विशेष बाब म्हणून मंगोलिया देशात पाठवण्यात आले असून त्या ठिकाणी हे बौद्धधातू काही दिवस सार्वजनिक प्रदर्शनासाठी ठेवले जाणार आहेत. तसेच हे अवशेष सार्वजनिक प्रदर्शनासाठी मंगोलियामध्ये पाठवण्यात आल्याची माहिती भारतीय हवाई दलाने एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत दिली आहे. ***“भारतीय हवाई दलाच्या ‘आयएल-७६’ (गजराज) या विमानाने ३० मे रोजी दिल्लीवरून मंगोलियाला भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष हवाई मार्गाने पोहोचवले आहेत. हे सांस्कृतिक मुत्सद्देगिरी आणि भारताच्या सभ्यतापूर्ण प्रसाराचं प्रतीक आहे. बौद्ध जगभरात ज्ञान, करुणा आणि प्रबोधनाचे प्रतीक म्हणून पूजनीय असलेले हे पवित्र अवशेष मंगोलियासाठी देखील अत्यंत महत्त्वाचे आहेत. मंगोलियातील हे सार्वजनिक प्रदर्शन बौद्ध धर्माच्या सामायिक वारशाने जोडलेल्या भारत आणि मंगोलिया या दोन राष्ट्रांमधील शतकानुशतके जुने आध्यात्मिक नाते अधिक दृढ होण्यास मदत होते. भारतीय हवाई दलाच्या या कृतीतून श्रद्धा, वारसा आणि दोन्ही देशांमधील सखोल सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संबंध अधोरेखित होतात”,*** असे भारतीय हवाई दलाने पोस्टमध्ये म्हटले आहे.

## परिस्थितीचे रडगाणे गाण्यापेक्षा संघर्ष करा, यश नक्की मिळेल : ई.झेड. खोब्रागडे




### उत्तर नागपूरमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नागपूर :** विद्यार्थ्यांनी परिस्थितीचे रडगाणे गात बसण्यापेक्षा शैक्षणिक प्रगतीकडे धाव घ्यावी. या संघर्षातून तुम्हाला यश नक्की मिळेल, असे आवाही माजी सनदी अधिकारी ई.झेड. खोब्रागडे यांनी केले.

युवा ग्रॅज्युएट फोरमच्या वतीने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या उत्तर नागपूर परिसरातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला एम.के. आझाद महाविद्यालयाच्या प्राचार्य रेश्मा खान, परदेशी शिष्यवृत्तीचे मार्गदर्शक हेमंत सुटे, युवा ग्रज्युएट फोरमचे प्रमुख अतुल खोब्रागडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिडशेपेक्षा अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. ई. झेड. खोब्रागडे पुढे म्हणाले की, दहावी आणि बारावीचे वर्ष अत्यंत महत्त्वाचे असते. या काळात तुम्ही अभ्यासाला महत्त्व द्यायला हवे. अडचणी आल्या तरी त्याच्याशी दोन हात करत आपण पुढे गेलो तरच यश मिळेल, असेही ते म्हणाले. रेश्मा खान यांनी या उपक्रमाचे कौतूक करत यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल असे सांगितले. हेमंत सुटे यांनी भविष्यात परदेशी विद्यापीठांमधील शिक्षणाच्या संधींची माहिती दिली. शासनाच्या अनेक योजना असून त्याचा लाभ घेऊन विदेशातही शिक्षण घेता येते, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतुल खोब्रागडे यांनी केले. संचालन अमित सवई आणि मृणालिनी कोटांगले यांनी केले. तर आभार प्रदर्शन संघपाल निकोसे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघपाल निकोशे, आशिष सनकाले, आकाश रामटेके, तन्मय वानखेडे, सोनूताई निकोशे, पूजा सवई, स्नेहा पाटील, अनिकेत मैत्रेय, राहुल बारसागडे, प्रतीक जमागडे, सागर मोटाघरे यांनी परिश्रम घेतले.

## अंगणवाडी सेविकांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे



**मुंबई :** राज्यातील अंगणवाडीत शिकणाऱ्या बालकांना अधिक गुणवत्तापूर्ण आहार उपलब्ध करून देण्यासाठी आहार दरवाढीबाबत शासन सकारात्मक आहे. अंगणवाडी मदतनीस पदावरून थेट नियुक्तीने अंगणवाडी सेविका पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्यासंदर्भातही पावले उचलली जात आहेत, अशी माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री तटकरे बोलत होत्या. बैठकीत अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वि.रा. ठाकूर, एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे विजय क्षीरसागर, भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष डॉ. डी.एल. कराड, अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या अध्यक्ष शुभा शमीम उपस्थित होते. अंगणवाडीतील बालकांना अधिक उत्कृष्ट आणि पोषक आहार मिळावा यासाठी आहार दरवाढीचा प्रस्ताव प्रक्रियेत आहे. कर्मचाऱ्यांच्या उपदान (ग्रॅज्युएटी) संदर्भात शासन सकारात्मक आहे. महिला विकास विभागाच्या वतीने प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रोत्साहन भत्ता आणि केंद्र शासनाकडील थकीत मानधन तातडीने अदा करण्याबाबतही कार्यवाही सुरू आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रांच्या भाडेवाढीसंदर्भात केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील अडचणी कमी करण्यासाठी केंद्रांमध्ये वाय-फाय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही कार्यवाही करण्यात येत असल्याचे तटकरे यांनी सांगितले. यावेळी अंगणवाडी कर्मचारी व सेविकांच्या इतर विविध मागण्यांवरही चर्चा करण्यात आली.






## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प 163

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा त्रिशरण चौक जयभीम नगर नागपूर



त्रिशरण चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर आणि जयभीम नगरच्या मध्ये आहे. अजनी पोलीस स्टेशन ते रामेश्वरी पर्यंत च्या रस्त्याला सुभेदार रामजी आंबेडकर मार्ग असे नाव नागपूर महापालिकने दिले आहे. हा दक्षिण नागपूरचा महत्त्वाचा आणि चळवळीच्या भाग आहे. येथे सर्व कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो. 9370773608

## प्राचीन स्तुपावर प्रकाशयोजना व ऑडिओ गाईडचे अनावरण

# बौद्ध वारशाच्या जतनाला नवी दिशा

**नालासोपारा :** प्राचीन बौद्ध वारशाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या सोपारा प्राचीन स्तुपावर प्रकाशयोजना आणि ऑडिओ गाईड सुविधेचे अनावरण गुरुवार, २८ मे २०२६ रोजी उत्साहात पार पडले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग (मुंबई मंडळ) यांच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यक्रमामुळे बौद्ध अनुयायी आणि इतिहासप्रेमींसाठी हा दिवस अविस्मरणीय ठरला. संपूर्ण जगात बौद्ध धम्माचा संदेश पोहोचविणाऱ्या ऐतिहासिक सोपारा भूमीवरील प्राचीन स्तुपाच्या संवर्धनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सव समिती तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व शैक्षणिक संस्था, नालासोपारा (पश्चिम) यांच्या माध्यमातून संस्थेचे अध्यक्ष रूपेश जाधव आणि सचिव नरेश जाधव यांनी विविध स्तरांवर प्रयत्न करून या कामाला गती दिली. कार्यक्रमात प्रा. डॉ. सुरज पंडित आणि पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे मुख्य अधीक्षक डॉ. अभिजीत आंबेकर यांच्या हस्ते प्रकाशयोजना व ऑडिओ गाईडचे अनावरण करण्यात आले. प्रकाशयोजनेमुळे रात्रीच्या वेळी स्तुपाचे सौंदर्य अधिक खुलून दिसत असून पर्यटकांना आकर्षित करणारे नवे रूप प्राप्त झाले आहे. तसेच ऑडिओ गाईडच्या माध्यमातून अडीच हजार वर्षांपूर्वीच्या बौद्ध इतिहासाची माहिती सहजपणे उपलब्ध होणार आहे. यावेळी बोलताना प्रा. डॉ. सुरज पंडित यांनी सोपारा येथील बौद्धकालीन इतिहास, त्याचे जागतिक महत्त्व आणि या वारसा स्थळाच्या संवर्धनाची गरज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मुख्य अधीक्षक डॉ. अभिजीत आंबेकर यांनी पुढील काही वर्षांत सोपारा प्राचीन स्तुपाचा व्यापक कायापालट करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच या प्रकल्पासाठी नरेश जाधव यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाला ऑनलाइन माध्यमातून उपस्थित राहून माजी अतिरिक्त महासंचालक टी.जे. अलोन यांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई मंडळाचे, डॉ. आंबेकर, कैलास शिंदे आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. या प्रसंगी भूमीपुत्र



म्हणून ओळखले जाणारे रोहित पिसाळ यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव नरेश जाधव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्याध्यक्ष किशोर काकडे, सहसचिव हरिश गायकवाड, उपाध्यक्ष संजयकुमार खैरे, कर्नल सिद्धार्थ बर्वे, प्रा. संध्याताई वैद्य, हिराबाई काकडे, अभिजीत खैरे, प्रभाकर जाधव, ए. जे. पवार, प्रतीक्षा जाधव, संजीवनी खैरे, सविता साळवी, रुपाली जाधव, कांबळे ताई, तसेच बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी सवादकर यांचे नातू विक्रांत आणि विजय सवादकर यांच्यासह पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयुनी सिद्धी हिने मराठी आणि इंग्रजी भाषेत प्रभावीपणे केले. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. सोपारा प्राचीन स्तुपावरील प्रकाशयोजना आणि ऑडिओ गाईड उपक्रमामुळे या ऐतिहासिक स्थळाच्या संवर्धनाला नवी दिशा मिळाली असून इतिहासप्रेमी, पर्यटक आणि बौद्ध अनुयायांकडून या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे.

## महत्वाचे

### 'वनार्टी' राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात



**नागपूर :** न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि आदर्श प्रशासनाची उज्ज्वल परंपरा निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रविवारी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर येथे अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या 'वनार्टी'मध्ये आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केली. त्यानंतर उपस्थित अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून राजमातांना अभिवादन केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना मा. प्रशांत वावगे यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांनी आपल्या दूरदृष्टी, न्यायनिष्ठा आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या बळावर एक आदर्श राज्यव्यवस्था उभी केली. समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी त्यांनी राबविलेल्या योजना, महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले प्रयत्न तसेच धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात दिलेले योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांनी जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत सुशासनाचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्यातून सामाजिक समता, लोकसेवा आणि कर्तव्यनिष्ठ नेतृत्वाचे मूल्य अधोरेखित होते. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही मा. प्रशांत वावगे यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला प्रकल्प व्यवस्थापक डॉ. चेतन बन्सोड यांच्यासह 'वनार्टी'चे अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतीप्रती कृतज्ञता व्यक्त केली

### माईसाहेब व रमाई आंबेडकर यांना संयुक्त स्मृतीदिनानिमित्त अभिवादन



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने डॉ. सविता आंबेडकर (माईसाहेब) आणि माता रमाई आंबेडकर यांच्या संयुक्त स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन आलोक बुद्ध विहार, जुना बगडगंज, नागपूर येथे करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभेचे विदर्भ महासचिव राजकुमार वंजारी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.
कार्यक्रमात शहर शाखेचे उपाध्यक्ष हरिदास बेलेकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी डॉ. सविता उर्फ माईसाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अत्यंत कठीण काळात माईसाहेबांनी सावलीप्रमाणे त्यांची सेवा केली. त्यांच्या आजारपणात, सुख-दुःखात आणि सामाजिक कार्यात मोलाची साथ देत त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याला बळ दिले. त्यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनी विनम्र अभिवादन केले. अध्यक्षीय भाषणात राजकुमार वंजारी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अखिल विश्वाचे बाबासाहेब बनविण्यात माता रमाईंच्या त्यागाचे योगदान सर्वात मोठे आहे. आयुष्यभर अनेक संकटे, दुःख आणि अभाव सहन करूनही त्यांनी कधीही तक्रार केली नाही. स्वतः अंधारात राहून समाजासाठी प्रकाशाचा दीप बनलेल्या रमाईंच्या त्यागमय जीवनातून प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. रमाई आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनी त्यांना भावपूर्ण अभिवादन केले. कार्यक्रमाचे संचालन सविता पिल्लेवान यांनी केले, तर आभार प्रदर्शन कामिनी लावून यांनी मानले. याप्रसंगी पपीता मेंढे, रंजना बोरकर, सत्यवती पिल्लेवान, मनकर्णा वानखेडे, ममता निकोसे, द्वारका बावनगळे, श्वेता सुदामे, तुळसा अंबादे, सीता बोरकर, लीला खोब्रागडे, पुष्पा पाटील, संध्या रंगारी, सत्यभामा चहांदे यांच्यासह अनेक महिला उपासिका आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## प्रशिक बौद्ध विहारात रमाई चरित्र चित्रप्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागपूर :** मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त साईनगर येथील प्रशिक बौद्ध विहारात त्यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. स्त्रीभूषण रमाई आंबेडकर सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.
कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. डॉ. मुकुंद मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी साधी, कष्टाळू आणि त्यागमूर्ती रमाई तसेच उच्च विद्वत्तेने नटलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहजीवनातील प्रज्ञा, शील आणि करुणा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. रमाई आणि बाबासाहेब यांचे जीवन आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आदर्श असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनीता लांडगे होत्या. यावेळी राजकुमार वंजारी यांनी चित्रप्रदर्शनातील विविध चित्रांचा आशय आणि रमाईंच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांची माहिती उपस्थितांना दिली. त्यांनी स्त्रीभूषण रमाई आंबेडकर सामाजिक संस्थेच्या कार्याचाही परिचय करून दिला. महाराष्ट्रासह दिल्ली आणि इतर राज्यांमध्ये संस्था रमाई आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा प्रचार-प्रसार करत असल्याचे त्यांनी नमूद केले. चित्रप्रदर्शनात रमाईंच्या संघर्षमय जीवनातील विविध प्रसंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात त्यांनी दिलेले योगदान आणि त्यांचा त्याग यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले होते. प्रदर्शनाला उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने भेट देत रमाईंच्या जीवनकार्याविषयी जाणून घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सरोज माटे, केवल लांजेवार, सिद्धार्थ घोडेस्वर, सुंदरलाल पाटील, पुष्पा गायकवाड, माधुरी पाटील, पंचशीला मेश्राम, गौतम चहांदे, शीलवान गजभिये आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिहारी लांडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन चंद्रभान भोवते यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, बौद्ध उपासक आणि समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाल संस्कार व व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिरात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा जागर



**नागपूर :** संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम, जरूड (ता. वरूड, जि. अमरावती), बुद्ध विहार समन्वय समिती, नागपूर आणि शांती वन, चिंचोली-फेटरी (नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आठ दिवसीय बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिरात विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन, आरोग्य आणि सामाजिक जाणीवांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते अशोक सरस्वती यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरात सुमारे १०० निवासी विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. दिनांक २८ मे रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर यांच्या चमूने शिबिराला भेट देऊन विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी राज्य महिला कार्यवाह देवयानी भगत यांनी प्रात्यक्षिकांसह तथाकथित चमत्कारांचे सादरीकरण करून अंधश्रद्धेच्या नावाखाली बुवाबाबांकडून कशा प्रकारे फसवणूक केली जाते, याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी विवेकवादी विचारसरणी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारण्याचे आवाहन केले. डॉ. सुनील भगत, कार्याध्यक्ष, नागपूर जिल्हा यांनी विविध शगुन-अपशगुन आणि त्यांच्याशी निगडित समजुतींवर भाष्य केले. अशा अंधश्रद्धांमुळे अनेकदा व्यक्ती आणि समाजाचे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रीती नगरारे यांनी विद्यार्थ्यांना सिकल सेल ॲनिमिया या आजाराविषयी सखोल माहिती दिली. या आजाराची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना तर्कशुद्ध विचारसरणी विकसित करण्याचे आवाहन केले. तर संध्या राजूरकर, अध्यक्ष, नागपूर जिल्हा शाखा यांनी ₹आजचे विद्यार्थी आणि पालक₹ या विषयावर मार्गदर्शन करताना बदलत्या काळातील पालक व विद्यार्थ्यांच्या जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकला. सुवर्णा डोंगरे यांनी पालकांची भूमिका आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांविषयी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक सरस्वती यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. चिंचखेडे, मंडपे ताई, कल्पना गायमुखे, दिवे ताई तसेच इतर कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी, सामाजिक भान आणि व्यक्तिमत्व विकासाचे गुण रुजविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

## चोंडी मालापूर येथे ओबीसी जनगणना परिषद



**बाभूळगाव :** बाभूळगाव तालुक्यातील चोंडी मालापूर येथे ओबीसी जनगणना परिषदेचे आयोजन करण्यात आले. ओबीसीसह सर्व जातींची जातनिहाय जनगणना करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी आयोजित परिषदेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमासाठी चोंडी मालापूरच्या सरपंचांनी विशेष पुढाकार घेतला. परिषदेत बहुजन विचारवंत, चिंतक व कुशल संघटक राजू देशमुख यांनी जातनिहाय जनगणनेचे महत्त्व स्पष्ट करताना ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचे वास्तव समोर आणण्यासाठी जनगणना अत्यावश्यक असल्याचे सांगितले. यावेळी मध्यवर्ती नागरी सहकारी बँकेचे माजी व्यवस्थापक देवरावजी जीभकाटे यांनी शासनाच्या धोरणांवर भाष्य करताना ओबीसी समाजाला विविध योजनांमधून वगळण्याचा प्रयत्न होत असल्याची खंत व्यक्त केली. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींप्रमाणेच ओबीसी समाजालाही त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय मिळाला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. ओबीसी जनमोर्चा व भारतीय पिछडा शोषित संघटनेचे पदाधिकारी तसेच ओबीसी क्रांती दलाचे संस्थापक डॉ. विलास काळे यांनी ओबीसी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी जातनिहाय जनगणना अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. परिषदेत सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र परडके, सरपंच शितल देवानंद मडावी, शिवदास कावलकर, अनिल शेंद्रे, प्रगती कावलकर, सोनाली नगराळे, यशोधरा जुमनाके, जोशना वाघाडे, अरुणा कांबळे, मंथन देवानंद मडावी, माजी सरपंच शांताबाई निरंजन हुकरे, गजानन महादेव परतीके, वंदना किशोर बागडे, लता शिवाचार फलके, वनिता लीलाधर झोड, किरण श्रावण वाघमारे, प्रवीण शंकर गोपने आणि शुभम राजू मेटे आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ओबीसी जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी बाभूळगाव तहसीलदारांना निवेदन देण्याचा निर्णय घेतला. या अभियानात सर्व समाजबांधवांनी सक्रिय सहभाग नोंदवून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## संविधानिक अधिकारांवर गदा आणण्याचे प्रयत्न चिंताजनक : ॲड. दिशा वाडेकर



**वर्धा :** संविधानातील तरतुदींमुळे वंचित, शोषित आणि मागास घटकांचे उत्थान शक्य होत असताना विविध मार्गांनी त्या अधिकारांना कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चिंता सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता ॲड. दिशा वाडेकर यांनी व्यक्त केली. रमाई स्मृतिदिनानिमित्त रमाई फाउंडेशन, वर्धा यांच्या वतीने सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय येथे आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. "आंबेडकरी चळवळीसमोरील संविधानिक व कायदेशीर आव्हाने व उपाय" या विषयावर मार्गदर्शन करताना ॲड. वाडेकर यांनी संविधानविरोधी कायदे, तसेच काही न्यायनिर्णयांच्या माध्यमातून आरक्षणासह सामाजिक न्यायाच्या उपाययोजनांबाबत संविधानविरोधी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणात क्रिमी लेअरची अट, पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भातील निर्णय आदींचा संदर्भ देत त्यांनी वंचित घटकांच्या हक्कांवर होत असलेल्या परिणामांचे विश्लेषण केले. उच्च शिक्षण संस्थांमधील जातीय व लैंगिक भेदभाव तसेच तुरुंगातील कैद्यांना जातीच्या आधारे दिली जाणारी वागणूक याविरोधात लढलेल्या आपल्या न्यायिक संघर्षांची माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले बापूसाहेब गायकवाड (यूपीएससी ५६१ रँक, अहिल्यानगर) यांनी "उच्च शिक्षण : अस्मितेचे आयुध" या विषयावर मार्गदर्शन केले. आर्थिक परिस्थितीपेक्षा मनोबल अधिक महत्त्वाचे असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातून संघर्ष आणि यशाची प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी केले. शिक्षणातून मिळालेले ज्ञान समाजाच्या उन्नतीसाठी वापरले गेले पाहिजे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ महानाट्य दिग्दर्शक व आकाशवाणीचे निवृत्त निवेदक अशोक जांभूळकर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे आणि शिक्षणविषयक प्रेरणेमुळे स्वतःचे आयुष्य बदलल्याची भावना व्यक्त केली. संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी बुद्धिजीवी वर्गाने अधिक सक्रियपणे संघर्षात सहभागी होण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी माता रमाई यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. बुद्धवंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी डॉ. वृंदा साखरकर (बहामास), प्रा. कल्पना ताकसांडे, पल्लवी हलूले, डॉ. महेंद्र पखाले, रविंद्र जिंदे, ताराचंद भगत, दीपचंद जुमडे, राजाभाऊ ढाले, मिलिंद साखरकर, सुनील ढाले आणि छत्रपाल धाबर्डे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. ज्ञानेंद्र मुनेश्वर यांनी केले. प्रास्ताविक सरिता पखाले यांनी तर आभार प्रदर्शन रविंद्र जिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रमाई फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला वर्धा शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## व्हिएतनाममध्ये २ जून रोजी डॉ. आंबेडकर विचार संमेलन

### आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण

**मुंबई/हनोई :** डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल मिशन आणि मिशन फॉर अडवान्स नॉलेज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संमेलन व आंतरराष्ट्रीय पुरस्कार २०२६ कार्यक्रमाचे आयोजन २ जून २०२६ रोजी हनोई (व्हिएतनाम) येथे करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय संमेलनात भारतासह विविध देशांतील १०० ते २०० प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल मिशनची स्थापना इंजि. राजकुमार कांबळे यांनी १९९८ मध्ये क्वालालंपूर (मलेशिया) येथे केली होती. संस्थेची भारतात २००६ मध्ये अधिकृत नोंदणी झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करणे, सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा गौरव करणे आणि विविध देशांतील आंबेडकरी विचारांना जोडणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. सध्या या चळवळीशी सुमारे २५ देशांतील प्रतिनिधी जोडले गेले असून यापूर्वी मलेशिया, फ्रान्स, जपान, अमेरिका, इंग्लंड आणि भारतात मिळून दहा आंतरराष्ट्रीय संमेलने आयोजित करण्यात आली आहेत. यंदाच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून इंजि. राहुल वानखेडे यांची निवड करण्यात आली आहे, तर उद्घाटक म्हणून डॉ. पराग मून (नवयान बुद्धिस्ट चॅरिटेबल ऑर्गनायझेशन, ऑस्ट्रेलिया) उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून भंते विनया (अमेरिका) आणि मा. शिवदास वासे उपस्थित राहतील. इंजि. राहुल वानखेडे हे साहित्य, सामाजिक चळवळ आणि बहुजन विचारप्रवाहातील सक्रिय कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. त्यांच्या व्यवस्थाविध्वंस, सूर्यबीज आणि मुक्तीमूल्य या काव्यसंग्रहांसह रिपब्लिकन फाटाफूट : मनुवादी मानसिकतेची देण आणि जातीय आतंकवाद : स्वरूप आणि उपाय हे लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. दलित पँथर, नामांतर चळवळ, विद्यार्थी आंदोलन आणि ओबीसी-बौद्ध धम्म अभियानात त्यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे. प्रमुख अतिथी मा. शिवदास वासे यांनी महाराष्ट्र शासनाच्या भुविज्ञान व खनिकर्म संचालनालयात मुख्य रसायनशास्त्रज्ञ म्हणून सेवा बजावली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची शाखा नागपूर येथे स्थापन करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची विशेष दखल घेण्यात आली होती. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे.

**आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर**

**संमेलनात पुढील मान्यवरांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत :**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार – डॉ. प्रा. यशवंत मेश्राम**
**नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय पुरस्कार – आत्माराम मेश्राम**
**सावित्रीबाई फुले आंतरराष्ट्रीय पुरस्कार – डॉ. अलका ढोके**
**जिजामाता आंतरराष्ट्रीय पुरस्कार – निर्मला गजभिये**
**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय पुरस्कार – डॉ. संजीव कांबळे**
**अहिल्याबाई होळकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार – ॲड. अपेक्षा शामकुवर**
**बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय पुरस्कार – डॉ. गौतम गोसावी**
**संत रविदास आंतरराष्ट्रीय पुरस्कार – हारमेश लाल (जालंधर, पंजाब)**
**बहुजन नायक कांशीराम आंतरराष्ट्रीय पुरस्कार – गुरशरणसिंग झाली (दिल्ली)**
**इंजि. राजकुमार कांबळे आंतरराष्ट्रीय पुरस्कार – डॉ. आनंद भालेराव**

**दोन सत्रांत होणार विचारमंथन**

संमेलनाच्या पहिल्या सत्रात महिलांसाठी विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला असून त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजमाता जिजाऊ आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर चर्चा होणार आहे. दुसऱ्या सत्रात डॉ. आंबेडकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी हक्क विषयक योगदानावर अभ्यासपूर्ण मंथन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या समारोपात आंतरराष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या संमेलनाची माहिती डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल मिशनचे प्रसिद्धी प्रमुख सुजित मुरमाडे व डॉ. दीपक राऊत (मुंबई) तसेच मिशन फॉर अडवान्स नॉलेज फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. दिगांबर खोब्रागडे आणि सचिव माधवी मुरमाडे यांनी दिली.



## व्यसनमुक्तीच्या संकल्पाने सेवानिवृत्तीचा निरोप समारंभ

**नागपूर :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर येथून सेवेचे ३० वर्षे पूर्ण करून ५८ व्या वर्षी निदेशक अरविंद रणवीर यांनी आपल्या आप्त मित्र परिवारांना बोलावून व्यसनमुक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी अरविंद गणवीर व सौ. गणवीर यांचा पुष्पगुच्छ, व्यसनमुक्तीपर पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला. नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीचा संकल्प दिला. यावेळी व्यसनाचे प्रकार, दुष्परिणाम व त्यावरील उपाय यावर आळणे यांनी माहिती दिली. इतर उपस्थितांना देखील व्यसनमुक्तीपर महामानवांची विचार पुस्तके वितरित करण्यात आली. कार्यक्रमाला अनिल गजभिये, विनोद लोखंडे, महेंद्र रामटेके, सुरज तभाने, राजेश वासनिक, सागर गेडाम, संदीप बारटवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गौतम चंद्रिकापुरे यांनी केले तर आभार सचिन चुडे यांनी मानले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648